**<u>नि.दि.दावा क्र. ३७७/२००४</u>**

निशाणी क्र.११७ लगत.

<u>प्रतिवादी क्र.८ चा साक्षीदाराचा शपथेवर उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. पठाण यांचेमार्फत</u>–

मला मराठी लिहिता वाचता येते. मारुती महादु पांढरकर हे माझे सख्खे भाऊ आहेत. मी व माझ्या भावाने सन १९८९ मध्ये गट क्र.८४ बाबत दावा दाखल केला होता. त्या दाव्यामध्ये माझ्या अर्जावरुन कोर्ट कमिशन झाले होते. सदरचा दावा खारिज (डिसमिस) झाला होता. दाव्याची कैफियत देताना व सरतपास देताना सन १९८९ च्या दाव्याबाबत काहीही कथन केले नाही. मी सदरचा जबाब एकुण ७ ते १२ प्रतिवादींमार्फत देत आहे. बाकीच्या प्रतिवादींना मी त्यांच्यामार्फत जबाब देत आहे हे माहिती आहे. त्यांनी त्यांच्या वतीने जबाब देण्यासाठी मला संमती दिली आहे. गट क्र.८४ हा माझ्या व माझा भाऊ मारुती याच्या नावे आहे. गट क्र.८४ चे पुर्ण क्षेत्र ५५ गुंठे आहे. गट क्र.८४ मध्ये महादेवाचे मंदिर आहे.

प्रश्न– महादेवाचे मंदिराकडे जाण्यासाठी सार्वजनिक वहिवाटीचा रस्ता आहे का ?
उत्तर– महादेवाच्या मंदिरात जाण्यासाठी रस्ता आहे परंतु तो सार्वजनिक नाही.

सदर दाव्यामध्ये माझा भाऊ मारुती पांढरकर हे जबाब देतील. महादेव मंदिराकडे जाणा–या रस्त्याचा वापर गट क्र.८२ ते ८८ व ८१ मधील सर्व शेतकरी करतात. सदर रस्त्याचा वापर ते लोक दावा दाखल झाल्यापासुन करत आहेत.

मी व माझ्या भावांनी सन १९८९ मध्ये मंदिराच्या जागेबाबत दावा दाखल केला होता. त्या दाव्यामध्ये मंदिराच्या रस्त्याचा उल्लेख केला होता. सन १९८९ च्या पुर्वीपासुन मंदिरासाठी १० फुटाचा रस्ता आहे असे नमुद केले आहे. सदर मंदिराच्या रस्त्याबाबत तहसिलदार यांच्याकडे देखील प्रकरणे झाली होती. तहसिल चौकशीमध्ये देखील मंदिराच्या रस्त्याचा उल्लेख आलेला आहे. तहसिलदार, प्रांत आणि आयुक्त यांचे सदर रस्ता खुला करण्याबाबत चे आदेश झालेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादीने दाखल केलेल्या परिशिष्ट अ नुसार सदर रस्ता दाखविलेला आहे. वादी हा मनुष्य बळावर जमीनीत घुसण्याचा प्रयत्न करत आहे याबाबत पोलीसात तक्रार केली होती. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्याबाबत मी कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केला नाही. मला सदर कागदपत्र न्यायालयात दाखल करण्याची गरज भासली नाही म्हणुन ती दिली नाहीत.

मी तहसिलदार यांचेकडे शिव रस्त्याबाबत दाखल केलेल्या संदर्भातील कागदपत्र दाखल करु शकतो. शिवरस्ता आणि या दाव्यामध्ये नमुद केलेले महादेव मंदिर रस्ता वेगवेगळा आहे. शिवरस्त्याबाबत काय झाले त्याबाबतची कागदपत्र न्यायालयात दाखल केली नाहीत. कोर्ट कमिशन हे दावा क्र.४१०/२००४ मधील वादीच्या अर्जावरुन झालेले आहे. दावा क्र.४१०/२००४ मधील प्रतिवादी हे प्रस्तुतच्या दाव्यामध्ये वादी म्हणुन आहेत. प्रस्तुत दाव्यामधील परिशिष्ट अ मधील नकाशा मी पाहिला आहे. परिशिष्ट अ मध्ये जोडलेल्या नकाशाप्रमाणे सद्य स्थिती सदर रस्त्याची आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावरुन वादीला जाण्यायेण्यास देत नाही म्हणुन प्रस्तुतचा दावा वादीने दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/-

दिनांकः- ०४/१०/२०२५ ( एम. सी. शेख )

पारनेर दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पारनेर